**शिक्षण संचालनालय**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**
**महाराष्ट्र राज्य,**
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, डॉ ॲनी बेझंट रोड, पुणे-४११००१
दूरध्वनी : (०२०) २६१२०३६१, २६१२१३९४ email : doesecondary1@gmail.com
दूरध्वनी : (०२०) २६१२१३९६

---

क्र.अमाशा/संच मान्यता/२०२०-२१/माध्य-अ/३०७/1393
दिनांक :- ३०/४/२०२०

**प्रति,**

**विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व विभाग,**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सर्व.**
**शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई मनपा(पश्चिम/उत्तर/दक्षिण)**

**विषय :- शाळेतील विद्यार्थ्यांच्या आधारकार्डची माहिती अद्ययावत करण्याबाबत.**

संदर्भ :- १.शासन निर्णय क्रं एसएसएन-२०१८/प्रक्र१६/१५/टीएनटी-२ दि.२८/८/२०१५ व दि २/७/२०१६
२.शासन पत्र क्र संकिर्ण-२०१९/प्रक्र १५४//१९/टिएनटी दि.२१/४/२०२०

संदर्भाधिन शासन निर्णय व शासन पत्र पहावीत.

राज्यातील प्राथमिक ते माध्यमिक शाळांच्या संच मान्यता एनआयसी मार्फत तयार करुन जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी यांच्या लॉगीनवर उपलब्ध करुन देण्यात येतात. शिक्षणाधिकारी यांचेस्तरावरुन संबंधित शाळांना संच मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येते.

परंतु, राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या संख्येत दरवर्षी होणा-या वाढीमुळे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पुर्णत : होत नसल्यामुळे तसेच संस्था चालकांना विद्यार्थी संख्येमध्ये वाढ करण्याकरिता एक संधी देण्याच्या उदेशाने राजयातील सन २०१९-२० ची संच मान्यता स्थगित करण्यास शासन पत्र दि.१८/९/२०१९ व दि.११/११/२०१९ अन्वये स्थगिती देण्यात आली होती. सदरची स्थगिती ही शासन पत्र दि.१५/१/२०२० अन्वये उठविण्यात आलेली आहे. त्यामुळे सन २०१९-२० मधील विद्यार्थी माहिती स्टुडंट पोर्टलवर शाळांनी केंद्र प्रमुख यांच्याकडे फॉरवर्ड केलेली आहे. शाळांना दि.३०/९/२०१९ पर्यंची विद्यार्थी फॉरवर्ड करण्याची सुविधा देण्यात आलेली होती परंतु संच मान्यतेबाबत शाळांमध्ये संभ्रम असल्यामुळे स्टुडंट पोर्टलवर दि.३०/९/२०१९ पर्यंत विद्यार्थ्यांची नोद करण्यात आलेली नाही त्यामुळे शासनाने संदर्भ क्र ३ अन्वये सन २०१९-२० करिता दि.३१/१/२०२० पर्यंत नोंद केलेली विद्यार्थी संख्या विचारात घेण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि.३१/१/२०२० अखेर शाळांची स्टुडंट पोर्टलवरील नोंदी विचारात घेतल्या जाणार आहेत.

शाळांना सन २०१९-२० मध्ये स्टुडंट पोर्टलवर विद्यार्थी विषयक माहिती नोंद करताना आधार क्रमांकाची नोंद करण्याची देखील सुविधा पोर्टलवर उपलब्ध आहे परंतु असे दिसुन आले आहे की, विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक शाळेकडे, पालकाकडे असताना देखील ब-याच शाळांनी पोर्टलवर आधार क्रमांक अपडेट केलेले नसल्याचे दिसुन आलेले आहे. सदर सुविधा शाळांकरीता नेहमीसाठी उपलब्ध आहे.

शाळांना आधार अपडेट करावयाच्या विद्यार्थ्यांची यादी पुढील प्रमाणे पहावयास उपलब्ध आहे. Student→ Portal→ HM→ Login→ Report→ Status →Aadhar यावर क्लिक केल्यानंतर इयत्ता निहाय एकुण विद्यार्थी संख्या,आधार क्रमांक नोंद केलेले, आधार क्रमांक नोंद न केलेले विद्यार्थी यांची संख्यात्मक माहिती दिसेल व विद्यार्थी संख्येवर क्लिक केल्यानंतर त्या वर्गातील आधार क्रमांक नसलेल्या सर्व विद्यार्थ्यांची नावासह यादी दिसेल. त्यांच्या



Scanned with CamScanner

शाळेत शिकत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक स्टुडंट पोर्टलवर अपडेट केलेले नाहीत त्यांची उन्हाळी सुटटी/लॉकडाऊन च्या कालावधीत पुर्ण करावी तसेच ज्या विद्यार्थ्याकडे आधार कमांक नाहीत अशा विद्यार्थ्यांचे उन्हाळी सुटटी/लॉकडाऊन संपल्यानंतर नजिकच्या आाधार केंद्रावर आधार कार्ड काढण्याची कार्यवाही करावी.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळांच्या संच मान्यतेसाठी ज्या विद्यार्थ्यांचे आधार विषयक माहिती स्टुडंट पोर्टलवर नोंद केलेली असेल तेवढयाच विद्यार्थ्यांची संख्या संच मान्यता करताना विचारात घेतली जाणार आहे. त्यामुळे शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक स्टुडंट पोर्टलवर नोंद करण्यासाठी वेळीच कार्यवाही करावी.

ज्या विद्यार्थाचे आधार कार्ड नोंदविले जाणार नाही त्या विद्यार्थ्यांना शिक्षक संच मान्यतेसाठी गणले जाणार नाही. त्यामुळे शाळेतील सर्व विद्यार्थी आधार कार्ड धारक असतील याची दक्षता घ्यावी. गटशिक्षणाधिकारी यांनी तालुक्यातील आधार कार्ड न काढलेल्या विद्यार्थ्यांचा स्टुडंट पोर्टलवरील माहितीच्या आधारे आढावा घ्यावा व आाधार काढणा-या यंत्रणेच्या तालुका/जिल्हास्तरावरील समन्वयक यांचेशी संपर्क साधून तालुक्यातील सर्वच विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढले जातील व माहिती पोर्टलवर भरली जाईल याची दक्षता घेण्यांत यावी.

**(दिनकर पाटील)**
**शिक्षण संचालक**
(माध्य.व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रतः सविनय सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा.आयुक्त, शिक्षण, म.रा.पुणे यांना माहितीस्तव सादर
३. तांत्रिक संचालक, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,शिवाजीनगर,पुणे यांना माहितीसाठी

F/ASSEMBLYWORK14.6.17/

Scanned with CamScanner